**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २९ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **सध्याच्या आव्हानात्मक स्थितीतून एकजुटीनं बाहेर पडण्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात' मधून देशवासियांना आवाहन.**
2. **देशाच्या विकासात आणि अंतर्गत सुरक्षेत पोलीस दलांचं योगदान अत्यंत महत्वाचं असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.**
3. **अतिक्रमण नियमबद्ध करण्याच्या निर्णयामुळे १५ लाख कुटुंबांना लाभ होणार असल्याची महसूलमंत्र्यांची माहिती.**
4. **दिनांक 30 मार्च ते 4 एप्रिल दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज.**

मन कि बात - डेस्क २९.३.२६

सरता मार्च महिना जागतिक पातळीवर खूपच उलथापालथींचा होता. सध्या आपल्या शेजारी एक महिन्यापासून भीषण युद्ध चालू आहे. आपल्या लक्षावधी कुटुंबांतील एक कोटींहून अधिक भारतीय आखाती देशांमध्ये काम करतात. त्यांना सर्वतोपरी मदत करण्याबद्दल, आखाती देशांना विशेष धन्यवाद देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या मन की बातची सुरुवात केली. सध्याचा काळ आव्हानात्मक असून, आपल्याला एकजुटीनं या आह्वानात्मक स्थितीतून बाहेर पडायचं आहे, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. ही वेळ राजकारण करण्याची नाही. या स्थितीत जे लोक अफवा पसरवत आहेत, ते देशाचं मोठं नुकसान करत आहेत असं सांगून पंतप्रधानांनी सर्व देशवासीयांना जागरूक राहण्याचं, अफवांना बळी न पडण्याचं आणि अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचं आवाहन केलं आहे.......

आजच्या मन कि बात मध्ये मोदींनी 'ज्ञानभारतम् सर्वेक्षण' या हस्तलिखितांबद्दल माहिती गोळा करणाऱ्या ॲपचा उल्लेख केला. नागरिकांकडे एखाद हस्तलिखित असेल, किंवा त्याबद्दल माहिती असेल तर त्याचा फोटो ज्ञानभारतम् ॲपवरून जरूर सर्वांपर्यंत पोहोचवा, असं आवाहन त्यांनी केलं. जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट संघानं

रणजी करंडकावर पहिल्यांदाच आपलं नाव कोरल्याबद्दल त्यांनी संघाचं अभिनंदन केलं. 'जो खेलेगा वो खिलेगा' या उक्तीचा पुनरुच्चार करून पंतप्रधान म्हणाले की, फारशा लोकप्रिय नसलेल्या खेळांनाही आता आपल्या देशाचे तरुण आपलंसं करत आहेत, हे बघून मला आनंद वाटतो, असं ते म्हणाले. पंतप्रधानांनी देशवासियांना साखर कमी खाण्याचं आणि खाद्य तेलात १० टक्के कपात करण्याचं आवाहनही केलं. बेंगळुरूमधील Institute of education research च्या अन्वेषण या प्रयोगाचा मोदी यांनी आवर्जून उल्लेख केला. शिक्षणाच्या माध्यमातून भूतकाळाचे संरक्षण करण्याचा आणि भविष्याची तयारी करण्याच्या नागा समाजाचा उल्लेख त्यांनी केला. या पद्धतीला आता मोरुंग शैक्षणिक संकल्पना म्हटलं जातं, असं ते म्हणाले. देशभरात सुमारे 50 लाख कृत्रिम जल संधारण संरचना आणि अमृत सरोवर अभियानाच्या अंतर्गत सुमारे ७० हजार अमृत सरोवरे निर्माण करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. लोक सहभागातून 'एक पेड माँ के नाम' अभियानाला यश मिळत असल्याच पंतप्रधान म्हणाले.

पोलिस ड्युटी मीट

'पोलीस ड्युटी मीट' हा विविध राज्यांनी विकसित केलेल्या क्षमतांचं आदान प्रदान करण्यासाठी महत्त्वाचा मंच आहे. यामुळे सामूहिकरित्या आपली कार्यक्षमता वाढवण्यासाठी मदत होते, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. नागपुरात आज ६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीटचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पोलीस दल एक शिस्तबद्ध विभाग असून देशाच्या विकासात आणि अंतर्गत सुरक्षित पोलीस दलाचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं ते म्हणाले. कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी कायदा आणि सुव्यवस्था मजबूत असणं अत्यावश्यक आहे आणि ही जबाबदारी पोलीस अत्यंत सक्षमपणे पार पाडतात, असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले. भारतातील पोलीस दलांचा इतिहास अत्यंत गौरवशाली राहिलेला असून भविष्यातही ते देशाच्या सुरक्षा आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावतील अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी मंचावर राज्यमंत्री आशिष जयस्वाल, पोलीस महानिदेशक सदानंद दाते आदी मान्यवर उपस्थित होते. नागपुरात दिनांक 29 मार्च ते 3 एप्रिल दरम्यान अखिल भारतीय पोलिस ड्युटी मीटचं आयोजन करण्यात आलं आहे. या ड्युटी मीट मध्ये देशभरातील 29 पथके, 935 पोलिस कर्मचारी आणि 152 डॉग स्क्वॉड सहभागी होणार आहेत. या मीटमध्ये संगणक जागरूकता, डॉग स्क्वॉड,

व्हिडिओग्राफी, अँटी-सबोटाज तपासणी, वैज्ञानिक तपास पद्धती आणि फोटोग्राफी यांसारख्या स्पर्धा होणार असून एकूण 63 पदके आणि 17 चषक देण्यात येणार आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे

२०११ पूर्वी सरकारी जागेवर दीड हजार चौरस फुटांपर्यंत असलेलं अतिक्रमण नियमबद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज नागपुरात नियोजन भवन इथं प्रसार माध्यमांशी बोलत होते. या योजनेमुळे सुमारे १५ लाख कुटुंबांना लाभ होणार असल्याच त्यांनी सांगितलं...........

यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल मिळत होते. मात्र आता सर्वसामान्य नागरिकांसाठी पट्टे वाटपाचा निर्णय घेतला असून, पट्टा मिळाल्यानंतर केवळ १ हजार रुपयांत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी 28 हजार प्रकरणे प्रलंबित होती. त्यासाठी 57 आर्बिट्रेटर्सची नियुक्ती करण्यात आली असून, लवकरच या प्रकरणांचा निकाल लागेल, असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

मनपा सन्मान

महाराष्ट्र शासनाच्या वतीन राबविण्यात आलेल्या 150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स मोहिमेमध्ये राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयांच्या गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाला प्रथम क्रमांकान सन्मानित करण्यात आलं. मुंबईत सह्याद्री अतिथी गृहात आयोजित समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नागपूर परिक्षेत्र यांना ई-गव्हर्नन्स आणि वेबसाईट विकास क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याचप्रमाणे नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाला आपले सरकार प्रणाली, ई ऑफिस, व्हाट्सअप चॅटबॉटसाठी द्वितीय क्रमांकाच्या पुरस्कारान सन्मानित करण्यात आलं. नागपूर जिल्हा परिषदेला प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमतेत वाढ आणि निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी विकसित केलेल्या “झेडपी पॅनोरमा” या डॅशबोर्डसाठी गौरविण्यात आलं.

संगठन सृजन

देशाच्या राजकीय पटावर नवचैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशान अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीन 'संघटन सृजन' हे अभियान सुरू करण्यात आलं आहे. राजस्थान मधील माजी आमदार आणि काँग्रेसच्या पर्यवेक्षक संगीता बेनीवाल यांनी या संदर्भात आज गोंदिया इथं पत्रकारांशी संवाद साधत या अभियानाची दिशा, उद्दिष्टे आणि दृष्टिकोन स्पष्ट केला. हे अभियान केवळ एक प्रशासकीय उपक्रम नसून पक्षाच्या संघटनात्मक पुनर्रचनेचा आणि विचारधारेच्या पुनर्जागरणाचा व्यापक प्रयत्न असल्याचं त्यांनी सांगितलं. या अभियानाचा मुख्य हेतू जिल्हा काँग्रेस समित्यांना अधिक सक्षम, उत्तरदायी आणि जनसंवादी बनविण असा आहे असं त्या म्हणाल्या.

खेलो इंडिया

छत्तीसगढमधे रायपूर इथं पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धेत महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी १ सुवर्ण, ३ रौप्य आणि एका कास्य पदकाची कमाई केली. नागपूरच्या तन्वी धुर्वेन - सुवर्ण, पलाश ठाकुरन रौप्य आणि कास्य पदकं पटकावलं.

हवामान

विदर्भात तापमानाचा पारा वाढत आहे. काल अकोला इथं ४१ पूर्णांक २, अमरावती इथं ४१ तर नागपुरात ४० पूर्णांक २ इतकं कमाल तापमान नोंदविलं गेलं. वाशीम, वर्धा, चंद्रपूर, या ठिकाणी ४० पेक्षा अधिक तापमान राहीलं. या सर्व जिल्ह्यांत किमान तापमानात देखील वाढ होत असून आज नागपुरात २१ पूर्णांक २ दशांश अंश इतकं किमान आणि ३९ पूर्णांक ६ इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. उद्यापासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपार नंतर होणाऱ्या वादळी पावसाचं नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. 30 मार्च रोजी प्रामुख्यान खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो. त्यानंतर 1 ते 4 एप्रिल दरम्यान वादळी पावसाचं प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे.शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. तसच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचं नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी झाडाखाली, टिनशेड खाली तसच

विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभं राहणं टाळावं. दरम्यान अमरावती जिल्ह्यात आगामी काही तासांत वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला आहे.

*****